गद्य पाठ 10. वाट

ठळक मुद्दे-

या पाठाच्या आधारे तुम्ही खालील गोष्टींचा अभ्यास करू शकाल-

१. वाट या कथेचे कथानक
२. पारधी समाजाचे जीवन, पारधी समाजाच्या जीवनातील दु:ख
३. व्यक्तीव्यक्तीमधील नातेसंबंध
४. कथेची मांडणी- प्रसंग/ घटना यांची रचना, परिसर, संवाद, निवेदन,
५. चारुता सागर यांची भाषाशैली

**प्रस्तावना** - आत्तापर्यंत तुम्ही अनेक कथा वाचल्या आहेत.त्या कथा कोणता दृष्टिकोन ठेऊन वाचायच्या ते 'कथा वाचायच्या आधी'(hyperlink करायचे आहे का?) ह्या टिपणाच्या आधारे समजून घ्या. त्या आधारे 'वाट' ही चारुता सागर यांची कथा वाचा. शक्य झाल्यास टिपणातील मुद्द्यांच्या आधारे कथा वाचताना मुद्दे काढा.

**कथेचा आशय –**

बाजारात जख-याने निरोप सांगणे आणि तोही 'म्हातारी टिकणार नाही' ह्या वेगळ्या वाटणा-या प्रसंगाने या कथेची सुरुवात होते. म्हातारीच्या मुलीला म्हणजे कावारीला हा निरोप कळतो आणि मरणाच्या दारात असलेल्या आईला भेटण्याची ओढ कावरीला लागते. ही या कथेची नायिका आहे. आईला भेटायला येण्या-या तिच्या दारुण अनुभवातून हे कथानक पुढे पुढे जाते.

आईच्या भेटीने व्याकूळ झालेली ती आपल्या एका छोट्या मुलाला बरोबर घेते, त्याचवेळी अन्य बालबच्चांचे पाश जड अंत;करणाने दूर ठेवते.

एकाच ध्यासाने झपाटलेली कावरी वाटेत भेटेल त्याला एकच प्रश्न  विचारते आणि आईचे 'पालं' म्हणजे घराचा तंबू कोठे असेल ते शोधायचा आटोकाट प्रयत्न करते. त्यासाठी ती चार दिवस अन्नपाणी विसरते, द-या खो-यात, काट्याकुट्यात चालत राहते. पायात त्राण उरत नाहीत पण मनातील आईला भेटण्याची ओढ वाट शोधतच राहते.

अखेर शेवटी पालं उतरल्याच्या खाणाखुणा दिसतात.मन आशेने पल्लवित होते, पण शेवटी आईची भेट न झाल्याने कावरी कोसळते. आल्या पावली जड अंत:करणाने माघारी फिरते.

**कथेची वैशिष्ट्ये-**

खरे तर ही कथा फक्त कावरी आणि तिच्या आईच्या वियोगाची नाही तर लेखकाला जीवन दर्शन घडवायचे ते अशा  समाजाच्या हालाखीच्या परिस्थितीचे. अगदी जवळच्या नातेवाईकांना भेटणेही त्यांच्या जीवनात दुरापास्त होते. जीवन जगण्यासाठी सतत फिरत राहिल्याने जीवनातील सुरक्षितता गमावून बसलेला हा समाज आहे.

समाजातील व्यक्तींचा विकास तर दूरच राहतो, पण साधी जीवन जगण्यासाठी आवश्यक साधनेही ह्या समाजाला दुरापास्त होतात. आर्थिक विवंचनेमुळे प्रवासाची साधनेही गरजेच्या वेळीही दुर्लभ होतात.आजच्या काळात सहज वाटणारी संपर्क साधनेही त्यांच्यापर्यंत पोहोचलेली नाहीत.

ह्या समाजाची एकमेकांना भेटण्याची पद्धती, निरोप देण्याची रीत, त्यांच्या राहण्याच्या जागा आणि जगण्याची पद्धत पाहिली तरी त्यांचे दु;ख समजून घेता येते. राहण्याची जागा गावाच्या बाहेर. बाजाराला जायचे तेही चार कोसांवर.पालाच्या खाणाखुणा त्यांच्या दारिद्र्याची कल्पना देतात.

या पार्श्वभूमीवर विरोधाभास जाणवतो तो माणसामाणसातील नात्यांचा.कावरीचा नवरा भिमा, एकमेकांना सांभाळून घेणारी व मदत करणारी माणस त्यांना जीवन जगायला उभारी देत असतील, असे चित्रण लेखकाने केले आहे.

या कथेद्वारे समाजातील एका दुर्बल घटकाच्या जीवनाचा परिचय आपल्याला अस्वस्थ करून जातो.

लेखकाची भाषाशैली-

अनुभव मनाला भिडतो तो लेखकाच्या अनुभव चित्रण करण्याच्या शैलीमुळे आणि त्याने वापरलेल्या भाषेमुळे. यामुळे अनुभव दु;खद असूनही त्याचे सौंदर्य आपल्याला जाणवते. तेव्हा लेखकाच्या भाषाशैलीचे विशेष समजून घ्या.येथे मुद्दे दिले आहेत. त्यानुसार कथेतील शब्द, वाक्ये, परिच्छेद, तसेच अलंकार शोधा.

एका अनुभवातून एका समाजाच्या  जीवनाचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य आहे.

घटनांच्या मांडणीतून अनुभव  फुलविण्यात लेखक यशस्वी झाल्याचे दिसून येते.

कथेतील अनुभवाला फुलविणा-या चालीरीती, परिसर, व्यक्ती, यांचे चित्रण आहे. त्यातून अनुभवाचे कारुण्य प्रत्ययास येते.

बोली भाषेमुळे अनुभव चित्रीकरणाला जिवंतपणा आला आहे. त्या समाजातील शब्द वापरल्याने अनुभव अधिक उठावदार होतो.

पाण्यावर तेलाचा तवंग पसरावा असा यांसारख्या उपमा व उत्प्रेक्षा, रूपक अलंकारांच्या वापरामुळेही कथेला सौंदर्य प्राप्त झाले आहे.

उजळणी प्रश्न

अ. खालील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा.

१. 'आणि आता तिच्यापुढ ना वाट होती, ना त्या वाटवर पडणारी पावलं तिची होती' असा शेवट लेखकाने का केला आहे?

२. लेखकाने चित्रित केलेल्या प्रसंगांपैकी कोणता प्रसंग तुम्हाला अधिक आवडला? का?

३. खालील वाक्यातील सौंदर्य स्पष्ट करा.-

१. आपल्याबरोबर जाख-याचं दु;ख वाहून नेलं होत.

२. न्हाई म्हटलं की, पुन्हा हताश व्हावं; अगदी निराधार, पुरात पाय अंतराळी झाल्यागत.

३. आभाळ फुटल्यासारखं डोळ गळू लागल.

ब. खालील प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.

१. कथेच्या आधारे आपल्या समाजातील कोणकोणत्या समस्या तुम्हाला जाणवल्या ते लिहा.

२. 'वाट"या शब्दावरून तयार होणारे वाक्प्रचार लिहून त्यांचा स्व:ताच्या शब्दांत उपयोग करा.

क. खालील वाक्यांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

१. गेलेला जीव एकदम तिच्या पायात आला.

२.आणि विजेसारखं लखकन काळीज हालल, तशी धावली.

**<u>मुक्त प्रश्न</u>**

1. ' मी कावरी बोलतेय" ह्या विषयावर १० ते १२ ओळी लिहा.
2. आपल्या समाजातील अन्य एखाद्या समस्येवर आधारित कथा लिहिण्याचा प्रयत्न करा.